# कुलाबा-सीप्झ मेट्रोची भुयारी मार्गात चाचणी होणार

◆प्रतिनिधी : मुंबई

## आरेतील झाडांना धक्का न लागू देण्याचे मुख्यमंत्र्यांचे निर्देश

दक्षिण मुंबईतील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी महत्वाची मेट्रो मार्गिका असलेल्या कुलाबा ते सीप्झसाठीच्या मेट्रो रेल्वे डब्यांची चाचणी मरोळ मरोशीतील भुयारी मार्गात करण्यात येणार आहे. या चाचणीमुळे हा मेट्रो प्रकल्प दृष्टिपथात आला आहे. राज्य सरकारने स्थगिती दिलेल्या आरेतील त्या जागेच्या हद्दीबाहेरच ही चाचणी करण्यात येणार असून आरेतील एकाही वृक्षाला धक्का न लागू देता मेट्रोच्या चाचण्या पूर्ण कराव्यात, अशी सूचना मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केली आहे.

सध्या मरोळ मरोशी या रस्त्याच्या भुयारी मार्गाचे काम चालू असून या कामाच्या जवळच रॅम्प बनवून मेट्रो चाचणीचे काम हाती घेण्यात येणार आहे. विशेष म्हणजे या चाचणीच्या कामासाठी कोणतेही झाड तोडण्यात येणार नाही. मुंबईतील वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी आणि प्रदूषण कमी करण्यासाठी कुलाबा ते सीप्झ या मार्गावर मेट्रो लाईन-३ चे काम प्रगतीपथावर आहे. या मार्गिकेसाठी अल्स्टॉम कंपनीने श्रीसिटी आंध्र प्रदेश येथे ८ डब्यांची ट्रेन तयार केलेली आहे. या गाडीची त्या ठिकाणी तांत्रिक चाचणी झाली आहे. आता प्रत्यक्षात याची चाचणी मुंबईत १० हजार किमी चालवून घेण्यात येणार आहे. त्यानंतर कुलाबा ते सीप्झ या मार्गिकेवरही ट्रेन चालविण्यात येणार आहे. या चाचण्या यशस्वी झाल्यानंतर अशा पध्दतीच्या ३१ ट्रेन्स या मार्गावर धावण्यासाठी उपलब्ध होणार आहेत.

